**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : नामदेव नावजी ढेंगळे,
वय : ३३ वर्षे,
व्यवसाय : पोलीस कॉन्स्टेबल, घोडेगाव पोलीस स्टेशन.
राहणार : घोडेगाव, ता. आंबेगाव, जि.पुणे.

**सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके**

१. घटनेवेळी माझी नेमणुक घोडेगाव पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणुन होती. दि.१८/१०/२०२१ रोजी दुपारी १.३० वाजेच्या सुमारास मी, सहाय्यक फौजदार कायगुडे, चालक पोलीस नाईक राहाणे, होमगार्ड लेंभे असे सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करीत असतांना सहाय्यक पोलीस निरीक्षक माने साहेब यांनी जनता विद्यामंदिर घोडेगाव येथील गेटसमोर आम्हाला बोलविले व सांगितले की, विद्यालयासमोर लावलेल्या फ्लेक्सबद्दल चौकशी करा. तेथे आरोपी कुंदन काळे यांच्या वाढदिवसाचे फ्लेक्स लागलेले होते. त्यानंतर आम्ही पेट्रोलिंग करत चिंचोली कोकणे येथे गेलो. तेथे देखील आरोपी कुंदन काळे याच्या वाढदिवसाचे फ्लेक्स लागलेले होते. त्यानंतर आम्ही गिरवली येथे पेट्रोलिंग करत गेलो. तेथे देखील आरोपी कुंदन काळे याच्या वाढदिवसाचे फ्लेक्स लागलेले होते. त्यानंतर आम्ही पेट्रोलिंग करत पिंपळगाव घोडे येथे गेलो. तेथे देखील आरोपी कुंदन काळे याच्या वाढदिवसाचे फ्लेक्स लागलेले होते. त्यानंतर आम्ही पेट्रोलिंग करत शिनोली येथे गेलो. तेथे देखील आरोपी कुंदन काळे याच्या वाढदिवसाचे फ्लेक्स लागलेले होते. त्यानंतर आम्ही पेट्रोलिंग करत डिंभे बसस्टॉप येथे गेलो. तेथे देखील आरोपी कुंदन काळे याच्या वाढदिवसाचे फ्लेक्स लागलेले होते.

२. त्यासंदर्भात आम्ही संबंधित गावच्या ग्रामसेवकाला फ्लेक्स बाबत विचारणा केली असता त्यांनी कळविले की, आमच्याकडून फ्लेक्स लावल्याबाबत कोणतीही परवानगी दिलेली नाही. त्यानंतर आम्ही घोडेगाव पोलीस स्टेशन येथे येऊन आरोपीविरुध्द सरकारतर्फे फिर्याद दिली.

३. आता मला दि.१८/१०/२०२१ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.२३** देण्यात येतो. आता मला दि.१८/१०/२०२१ रोजीची छापिल फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.२४** देण्यात येतो. मी आरोपीस पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपीचा गैरहजेरी माफीचा अर्ज अभिलेखावर दाखल आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास : आरोपी पक्षातर्फे वकील श्री. व्ही. आर. काळे यांच्यामार्फत</u>**

४. मी घोडेगाव पोलीस स्टेशन येथे पाच वर्षापासुन कार्यरत आहे. घटनेच्यावेळी मी गोपनीय विभागाचे कामकाज करत होतो. मला घोडेगाव पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येणा-या संपुर्ण गावांची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोपनीय विभागाचे कामकाज करतांना मला विविध पक्ष व पुढा-यांसोबत संबंध चांगले ठेवावे लागते, तसेच सदर पक्षांच्या तालुका कार्यकारणीची माहिती ठेवावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, घोडेगाव पोलीस स्टेशनमधुन पाहिले असता जनता विद्यालय दिसु शकते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनच्या मुख्य गेटला फिरता कॅमेरा लावला आहे व तो संपुर्ण भागाचे चित्रिकरण करतो. मी फिर्याद देतेवेळी सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करत होतो असे सांगितले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. आम्ही पेट्रोलिंगला गेलो त्याची स्टेशन डायरीला नोंद केली होती. हे म्हणणे खरे आहे की, कुंदन काळे हे घोडेगावचे रहिवासी आहेत.

५. कुंदन काळे हे घोडेगाव येथील दत्त जयंती निमित्त राज्यस्तरीय माहिला व पुरुष कबड्डी स्पर्धचे दोन वर्षापासुन आयोजन करत आहे. घटनेच्यावेळी ते आयोजन करत नव्हते. कुंदन काळे हे आता आमदार महेश लांडगे यांच्या आंबेगाव तालुका स्पोर्ट्स फाउंडेशनचे काम दोन ते तीन वर्षापासुन पाहत आहे. पुर्वी ते पाहत नव्हते. कुंदन काळे यांचे घोडेगावमध्ये सामाजिक कार्य आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, कुंदन काळे हे घोडेगाव परिसरामध्ये सामाजिक कार्य करतात त्यामुळे त्यांच्यामागे अनेक कार्यकर्ते आहेत. घटनेच्या दिवशी पेट्रोलिंग करुन आम्ही संध्याकाळी ५ ते ५.३० च्या दरम्यान परत आलो. त्यानंतर ६.१० मिनिटांनी मी फिर्याद दाखल केली.

६. हे म्हणणे खरे आहे की, पंच फारुक बाला सय्यद हे घोडेगावचे रहिवासी आहेत. ते पोलीस स्टेशनच्या अनेक प्रकरणात पंच म्हणुन काम करतात किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. पंच दिपक विष्णु पारधी हे घटनेच्यावेळी घोडेगाव पोलीस स्टेशनचे होमगार्ड म्हणुन काम पाहत होते किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. कुंदन काळे यांचा वाढदिवस कधी असतो हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतेही फ्लेक्स गावामध्ये लागलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी कुंदन काळे यांच्याविरुध्द त्यांच्या सामाजिक कार्यावरुन व इतर स्पोटर्सच्या कामावरुन, संशयावरुन फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणीतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.०३/०१/२०२६**
**घोडेगाव**